# ग्वाल्हेर गायकी
# परंपरा, प्रवाह, परिवर्तन

लेखक : श्रीकान्त यशवन्त वाघ
मार्गदर्शक : पं. विकास कशाळकर
पं. ना. वा. दिवाण

(२ डिसेंबर २००२ रोजी विद्यालयातर्फे पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने मनोहर मंगल कार्यालय, पुणे येथे झालेल्या चर्चासत्रानिमित्त विद्यालयाने प्रसिद्ध केलेली पुस्तिका)



हिंदुस्थानात वेदकाळी तीन स्वरांचे ऋचा गायन होत असे. पुढे या तीन स्वरांचे सात स्वर झाले. साम गायनांच्या चारही दिशांना वेगवेगळ्या परंपरा निर्माण झाल्या. संगीताच्या मध्ययुगात संगीताचे अनेक शास्त्रग्रंथ तयार झाले. नवनव्या रागरागिण्यांची निर्मिती झाली. या काळात अमीर खुसरो, गोपाल नायक, स्वामी हरिदास, बैजू बावरा, तानसेन यांसारखे अनेक विद्वान कलाकार उपजले. ते सारे ध्रुपद गात असत. राजाश्रयही लाभल्याने संगीताचा सुवर्णकाळ आला. मोगल साम्राज्यात विशेषत: उत्तरेकडे संगीतात निरनिराळे प्रयोग होऊन हळूहळू आजचे ख्यालगायन सुरु झाले.

प्रत्येक श्रेष्ठ कलाकार हा आपल्या स्वतंत्र प्रतिभेनें इतरांपेक्षा वेगळे आणि उत्तम असे कलाप्रदर्शन करीत असतो. तानसेन वगैरे ध्रुपदियांमध्येही वेगवेगळ्या परंपरा होत्या. त्यांना **'बानी'** (वाणी = वाचा, भाषा) म्हणतात. त्यांचा एक दोहा आहे -

जोरजोरसे खण्डार गावे । मधुर बोलको नौहार लेवे
साँस बडी है गोबरहार की । आलापचारी है डागुरकी

तानसेन हा अत्यंत बुद्धिमान गायक, मार्मिक कवी आणि रचनाकार होता. तो अखेरीस ग्वाल्हेरला राहिला. त्याने अनेक ध्रुपदे रचली. तानसेनांच्या पुत्रीवंशातले दहावे पुरुष म्हणजे न्यामतखाँ ऊर्फ सदारंग, सदारंगांनी अठराव्या शतकात मोगल बादशहा महम्मदशहाचे नाव घालून अनेक उत्तमोत्तम चीजा रचल्या व तेथपासून आजकालच्या ख्याल गायनास लोकप्रियता मिळू लागली. सदारंगाच्या शिष्य प्रशिष्यांमध्ये वेगवेगळ्या परंपरा निर्माण करणारे अनेक प्रतिभावान गायक होते. तानसेन हा एक अत्यंत श्रेष्ठ गायक होता. सहाजिकच हल्लीची सर्व घराणी स्वत:चा संबंध अशा पद्धतीने तानसेनाशी जोडतात.

------*------

तानसेन

पुत्री वंशातील सदारंग

(पुत्रवंश) अदारंग (भाचा) शक्करखा (भाचा) मख्खन खाँ

↓ ↓ ↓

(जामात) (पुत्र) (पुत्र)

सय्यद मूर निर्मूलशहा बडे महम्मद नथ्थन पीरबक्ष

↓ ↓

(शिष्य) बंदे अलिखाँ (किराणा) | मुबारकअली (जयपूर) | (नातू) घग्गे खुदाबक्ष (आग्रा) | (नातू) हद्दूहस्सू खाँ (ग्वाल्हेर)

------*------

असामान्य प्रतिभेच्या कलाकाराची गाणे मांडण्याची स्वतंत्र शैली (रीत आणि तंत्र) असते. उच्च प्रतीची कला आणि वेगळेपणा यामुळे या गाण्याला रसिकांमध्ये मानाचे स्थान मिळते. त्या कलाकारास उत्तमोत्तम शिष्य मिळतात. तेही आपापल्या प्रतिभेने गुरुकडून मिळालेली कला मांडू लागतात. त्या शिष्यांचे आणखी पुढे शिष्य आणि प्रशिष्य असे मिळून संगीताचे घराणे तयार होते.

घराणे म्हणजे संगीत प्रस्तुत करण्याची विचारप्रणाली. शैली ही व्यक्तिगत असते. घराणे किंवा परंपरा यात काही अनुशासन व जबाबदारीची भावना असते. घराण्याच्या मुळ पुरुषाची शैली हीच पुढे अनेक शिष्य-प्रशिष्यांनी चालवलेली घराणेदार गायकी होते. गाणे ही सांप्रदायिक कला नसून व्यक्तिगत असल्यामुळे घराण्यांमध्येही व्यक्तिपरत्वे वेगवेगळ्या शैली असतातच. गुलाबाचे असंख्य प्रकार असले तरी गुलाब हा एकच असतो. तसेच एकाच घराण्यात अनेक कलाकार आपापल्या स्वतंत्र प्रतिभेने संगीत मांडत असतात.

------*------

पूर्वीच्या काळी राजे महाराजे, संस्थानिक यांचा उदार आश्रय कलावंतांना मिळत

असे. उत्तमोत्तम कलाकार दरबारी असणे ही त्यांच्या प्रतिष्ठेची बाब असे. काही संस्थानिक हे स्वत:ही कलाकार होते. कलाकारांनाही अशा संस्थांनामध्ये साधना करणे सोयीचे झाले. ज्या ज्या संस्थांनामध्ये घराण्यांचे मूळ प्रवर्तक आश्रयास होते त्या त्या संस्थानांची शहरांची नावे त्या त्या घराण्यांना मिळाली. अकबराचे कलाप्रेम सर्वश्रुतच आहे. 'बाबुल मोरा नैहर छुटो जाय ही वाजिद अली शहा' (अयोध्येचा शेवटचा राजा) याची ठुमरी. हुसेन शर्कीचे टप्पे, महम्मदशहा रंगीलेची ध्रुपदे ही देखील प्रसिद्ध आहेत.

------*------

ग्वाल्हेरचे नरेश जयाजीराव महाराज यांचा उदार आश्रय अनेक कलाकारांना मिळाला. नथ्थन पीरबक्ष आणि हद्दूहस्सू खाँ हे तिथलेच. म्हणून नथ्थन पीरबक्षांपासून सुरू झालेल्या संगीत परंपरेला ग्वाल्हेर घराणे असे म्हणतात.

स्वर आणि लयीद्वारा आपल्या भावना व्यक्त करण्याची ललित कला म्हणजे संगीत. स्वर आणि लय याखेरीज शब्दार्थ, नाट्य इत्यादी संगीतबाह्य गोष्टींचे बंधन नसल्यामुळेच अभिजात संगीतात घराणी उत्पन्न झाली. भावगीत, नाट्यगीत इत्यादींमध्ये संगीताच्या स्वैर विलासास वाव नसल्यामुळे तेथे घराणी नाहीत. प्राचीन परंपरा नसल्यामुळे त्यांचे शास्त्र असे काही तयार झाले नाही.

संगीताची अशी एकूण सुमारे अठरा घराणी दिसून येतात. त्यातली चार प्रमुख मानली जातात. ग्वाल्हेर, किराणा, जयपूर आणि आग्रा. सर्वच घराणी सुरेलपणा आणि लयदारपणा यांचे काटेकोर पालन करीत असतात. कोणतेही घराणे बेसूर किंवा बेताल नसते. स्वर आणि लय यांचा स्थूल स्वरुपातील मेळ ग्वाल्हेर गायकीत दिसून येतो. जयपूर गायकीत या स्वरलयमेळाचा विचार जास्त सुक्ष्मतेने केलेला आढळून येतो. किराणा गायकीत स्वरांग तर आग्रा गायकीत लयांग जास्त तीव्रतेने मांडले जाते.

------*------

## अष्टांगप्रधान ग्वाल्हेर गायकी

अष्टांग गायकी म्हणजे गमक, आंदोलन, कंप, मींड, घसीट, पटक, खटक, मुर्की, जमजमा या आठ अंगांचा योग्य ठिकाणी योग्य तो उपयोग करुन प्रस्तुत केलेली गायकी.

ग्वाल्हेर गायकी ही अशी अत्यंत प्रासादयुक्त तरीही साधी आणि सरळ पद्धतीची आहे. ती समजण्यास सोपी अशीच असते. त्यात पाचपेच नाहीत. स्वर व लयींचा मेळ उत्तम साधला तरी स्वरतालांची सूक्ष्म कामगत नाही. त्यामुळे सर्वसामान्य श्रोते या गायकीचा सहज आनंद घेऊ शकतात.

**वैशिष्ट्ये :**

१) जोरदार, नैसर्गिक, मोकळा, सहज आवाज हे या गायकीचे पहिले वैशिष्ट्य. ग्वाल्हेर ही मूळची गायकी असल्याने त्यात हे अपेक्षितच आहे. स्वाभाविक आवाजात गाणे ही गोष्ट मान्य होण्यास चर्चेची जरुरी नाही असे केशवराव भोळे म्हणतात. वास्तविक सर्व घराणी ही मूळ पुरुषांच्या आवाज धर्मानेच निर्माण झाली. ग्वाल्हेर गायकी शिकून नंतर ज्यांनी स्वतंत्र गायकी निर्माण केली त्यांच्या आवाज लावण्याच्या पद्धतीत हेच तत्व दिसून येते.

२) ख्याल गायन हे काहीसे ध्रुपद अंगाचे आणि विलंबित चीजाही अनेक ओळींचे स्थायी अंतरे असलेल्या ध्रुपदासारख्याच असतात. कधीकधी त्यांचे तोंडच फक्त ख्यालासारखे असते. ख्याल गायनात गमकाचे विशेष स्थान आहे. मींडप्रधानता, बेहलावेयुक्त आलाप असे अष्टांगप्रधान गायन असते.. गाताना रागाच्या शुद्धतेकडे विशेष लक्ष दिले जाते. रागविस्तार बहुधा चीजेच्या अंगानेच होतो.

३) रागाची मांडणी कऱ्ताना सुरुवातीचा आलापच रागवाचक असा घेतात. त्यानंतर संपूर्ण अस्ताई दोनदा म्हणून मधल्या मात्रा भरुन संपूर्ण अंतरा म्हणतात. या पद्धतीत संपूर्ण चीजच आधी मांडल्याने रागाचे स्थूल स्वरुप झटकन श्रोत्यांच्या मनावर ठसते. अर्थात सुरुवातीलाच तारषडजाकडे जाण्याइतका आवाज तयार लागतो, हा भागही त्यात आलाच.

संपूर्ण चीजेच्या रुपाने रागाचे स्थूल स्वरुप मांडून पुढे विस्तार करताना हळूहळू रागाच्या सुक्ष्मत्वाकडे जातात. राग गायनात आलाप, बोलआलाप, बोलतान आणि तान या चारही अंगांचा उत्तम समतोल दिसून येतो.

४) वेगवेगळ्या आवाजास पेलू शकणाऱ्या भारदस्त स्थायी अंतऱ्यांच्या अनेकढंगी चीजा हे आणखी एक वैशिष्ट्य. चीजांमध्ये समेचे महत्व फार असते. तसेच अनेक ओळींच्या जीचांमध्ये समेच्या जागाही विशिष्ट अशाच असतात.

तसे पाहिले तर रागाचे चलन ठरलेले असल्यामुळे एका रागाची एकच उत्तम चीज बांधली जाऊ शकते. त्यानंतर बांधल्या जाणाऱ्या चीजा या समेचा स्वर किंवा ताल बदलून किंवा शब्दांच्या बदलाने साध्य होतात. ग्वाल्हेर गायकीला प्रदीर्घ परंपरा असल्याने उत्तमोत्तम चीजा तेथेच असणार यात काय संशय?

५) ग्वाल्हेरी गाणे साधारण मध्यलयीत चालते. ही लय पूर्वीपेक्षा कमी आहे पण अतिविलंबित कधीच नसते. झुमरा, तिलवाडा, आडाचौताल हे विशेष ताल असले तरी बरेचसे गायक एकताल पसंत करतात. लयीबरोबर सहजपणे गात सम साधणे हे वैशिष्ट्य खरेच पण कधी कधी समेचे महत्व अति वाटावे इतके असते. सहज गायन हे ग्वाल्हेर गायकीचे वैशिष्ट्य असल्यामुळे कोणताही अतिरेकीपणा हा या गायकीचा नसून गायकांचा आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

६) वेगवेगळ्या प्रकारांच्या ताना आणि तानांमधील लयकारी ग्वाल्हेर गायकीत सुस्पष्ट दिसत असली तरी आरोही, अवरोही, सरळ, सपाट, पल्लेदार तान हे या गायकीचे वैशिष्ट्य होय. काहीजण कुत्सितपणे असे म्हणतात की, हद्दूहस्सूखाँ ग्वाल्हेरला महाराजांच्या पलंगाखाली लपून चोरुन बडे मुहम्मदांचे गाणे ऐकुन तयार झाल्यामुळे त्यांच्या गळ्यात साध्या सरळ एकेरी तानाच बसल्या ! (वास्तविक चोरुन गाणे शिकण्याची सोय फक्त सहा एक महिन्यांसाठीच होती आणि तेवढ्यातच बडे मुहम्मदांचे गाणे आत्मसात करण्याइतके हे दोघे तरुण आधीच तयार असले पाहिजेत. अन्यथा अवघ्या सहा महिन्यात अशी तरकीब उचलणे अशक्यच.)

७) ख्यालाखेरीज चतरंग, त्रिवट हेही ग्वाल्हेर गायकीत गायले जातात. पलुस्करांची भजने, विनायकबुवा पटवर्धनांचे तराणे हे प्रसिद्धच आहेत. अलिकडे सौ. मालिनी राजूरकरांमुळे ग्वाल्हेरच्या टप्पा गायनाचा आनंदही आपल्याकडच्या रसिकांना मिळू लागला आहे.

------*------

अंतुबुवा जोशी म्हणत असत त्याप्रमाणे निरनिराळी घराणी ही संगीताच्या बगीचातील निरनिराळी फुले आहेत. सारीच फुले बगीचाची शोभा वाढवतात. घराण्यांमधील भिन्नता अभ्यासकांच्या सहज लक्षात यावी म्हणून पुढे एक तालिका दिली आहे :

| | ग्वाल्हेर | आग्रा | किराणा | जयपूर |
|---|---|---|---|---|
| आवाज | खुला, मोकळा जोरदार | खुला, बोजदार, नाकात, रेकून,ढाला | सुरेल, कृत्रिम चोरटा, आवळून | सहज, अकृत्रिम मुलायम |
| लयताल | मध्य-झुमरा तिलवाडा | मध्यलय | अतिविलंबित एकताल | विलंबित त्रिताल |
| आलापी | बेहलावे, मींड गमक | धृपद अंगाची, नोम-तोम, आक्रमक | विलंबित, स्वरप्रधान, भावपूर्ण, हळूवार, नाजूक | बुद्धिप्रधान, छोट्या तानांची बढत, लयपूर्ण |
| ताना | सरळ, सपाट, पल्लेदार, आरोही | आक्रमक जबड्याच्या दाणेदार- | कमी | पेचदार, वक्रगती लांबलचक |
| चीजा | भारदस्त, रसभरीत अनेक ओळींच्या | वेगवेगळ्या उठावाच्या द्रुतचीजा | शब्दास महत्व कमी बंदिशीच्या कायद्यांकडे दुर्लक्ष | गीताची संक्षिप्त बांधणी |
| स्वरलय मेळ | स्थूल, लयीशी सहज खेळ | लयप्रधान तालाशी झटापट | स्वरप्रधान, लयांगाचा वर्ताव कमी | सूक्ष्म मेळ, कधीकधी बिकट |
| ललित प्रकार | भजन, चतरंग, त्रिवट, तराणा, टप्पा | होरी गीते | ठुमरी | नाही. कधीकधी द्रुतचीजही नाही |
| राग | प्रसिद्ध | प्रचलित तसेच अप्रचलितही | भावपूर्ण-तोडी, मालकंससारखे | अप्रसिद्ध तसेच मिश्र |
| मूळपुरुष | नथ्थन पीरबक्ष हद्दूहस्सू खाँ | घग्गे खुदाबक्ष | बंदेअलिखाँ अब्दुल करीम खाँ | मुबारक अली अल्लादिया खाँ |

## ग्वाल्हेर गायकीतील प्रवाह

नायकी म्हणजे गुरुने शिकवल्याबरहुकूम घराणेदार गायकीच्या परंपरागत तालमीप्रमाणे गायन. निर्भेळ घराणेदार गाणे नायकीत ऐकायला मिळते. आजकाल परीक्षांमध्ये विद्यार्थी जे गातात तितका मर्यादित अर्थ नायकीचा कोणी करु नये. नायकीमुळे घराणी टिकतात. नायकीतूनच गायकी निर्माण होते. नायकीमध्ये इतरांचे ऐकत स्वत:च्या प्रतिभेने भर घालून स्वत:च्या आवाजधर्माप्रमाणे गाणे याला गायकी म्हणतात. ग्वाल्हेर गायकीची परंपरा ही सर्वात जास्त प्रदीर्घ असल्याने त्यात असे अनेक प्रतिभावान मातब्बर गायक निर्माण होणे स्वाभाविकच आहे.

गाणे हे मुळातच संप्रदायजीवी नसून व्यक्तीजीवी आहे. जो तो कलाकार आपापल्या प्रतिभेने आपापले गाणे रंगवतो. गुरुकडून घेतलेल्या विद्येमध्ये स्वत:च्या आवाजधर्माप्रमाणे भर घालतो. (काही गोष्टी सोडूनही देतो - न रुचल्याने किंवा न झेपल्याने) यातूनच त्याच्या गायकीची शैली तयार होते.

कधीकधी असे वाटते की, जो तो आपापल्या नैसर्गिक बुद्धिने आणि गळ्याने गात असतो. प्रशिक्षणाचे संस्कार त्यात असतातच. शास्त्राचे भाष्यकारच नंतर त्या त्या गायकाला कोणत्यातरी शैलीत अथवा परंपरेत नेऊन बसवतात.

पर्वतशिखरावर नदीचा उगम होतो. तेथून ती अनेक धबधब्यांनी खाली दरीत कोसळते आणि पुढे वहाते. त्यापैकी प्रत्येक धबधबा एकाच नदीचा असला तरी प्रत्येकाचे सौंदर्य वेगळे आणि मनोहारी असते. त्या त्या प्रपाताच्या स्वरूपाप्रमाणे त्याचे नाद आणि लय वेगवेगळे असतात. ग्वाल्हेर गायकीतही याच तत्वाने वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले असले पाहिजेत.

विष्णू दिगंबरांचे गाणे वेगळे तर बाळकृष्णबुवांकडेच शिकलेल्या इंगळेबुवांचे गाणे वेगळे वाटते. तसेच शरदचंद्र आरोलकर, अनंत मनोहर, पूँछवाले यांच्या गाण्याच्या शैलीही भिन्नभिन्न आहेत. उत्तरेकडच्या पोहनकर, उमडेकर यांचेही तसेच. निस्सार हुसेनांकडे शिकलेल्या वझेबुवांचे गाणे इतके वेगळे की त्याला आपल्याकडे वझे गायकी म्हणून ओळखतात. ओंकारनाथ ठाकूरांमुळे असाच ग्वाल्हेर गायकीचा वेगळा आविष्कार झाला.

कुमार गंधर्वांचे गाणेही असेच एक स्वतंत्र छाप पाडून राहिले.

------*------

## ग्वाल्हेर गायकीचे आजचे महत्व

बोलतो तसे गाण्यासाठी मुद्दाम गळा आवळायची जरूरी नसते. गाणे हे असे सहज सुंदर मोकळे पाहिजे. तसे गाण्याची प्रथा ग्वाल्हेर गायकीत आहे. आकलनास सोयीची असल्याने सर्वच विद्यार्थ्यांनी आधी ग्वाल्हेर गायकीचेच प्रशिक्षण घेतले पाहिजे. त्यांचे रागही संगीत शिक्षणास पायाभूत असेच असतात. त्यामुळे उत्तम स्वरज्ञान आपोआपच होते. हल्ली मैफिलींना श्रोतेही बहुसंख्य असल्याने एवढ्या मोठ्या जनसमुदायाचे मनोरंजन या गायकीतील पायाभूत रागांमुळे सहज होऊ शकते. ग्वाल्हेर परंपरेतील गायक शिक्षकांनी सुरू केलेले अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ संगीताच्या प्रसाराचे मोठे कार्य नेटाने करीत आहे.

ग्वाल्हेर गायकीच्या पायाभूत प्रशिक्षणानंतर आपणास जे आवडेल व झेपेल ते गाणे शिकावे व आपली कला वाढवावी असे अनेक श्रेष्ठ गायकांच्या चरित्रांवरुन दिसून येते.

------*------

## परिवर्तन

काळाबरोबर जनरुची बदलत असते. साऱ्यांनाच काळाबरोबर धावावे लागते. कोणतीही गायकी ही त्याला अपवाद कशी असणार? शिष्य गुरुसारखेच गाऊ लागला तर गुरु हयात असताना (हल्ली कॅसेट, सीडी यामुळे गुरुचे गाणे अमरच असते) शिष्याचे गाणे कोण ऐकणार? घराणेदार गायकीचा मूळ साचा कायम ठेवून प्रतिभावान शिष्य आपली शैली बनवीत असतात. जनरुचीही भिन्नभिन्न असते. त्यामुळे एकाच वेळी वेगवेगळ्या गायकी आणि एकाच गायकीतल्या वेगवेगळ्या शैली आपल्याला दिसत असतात.

स्वर अथवा लय यांच्यापैकी एकांगी तीव्रीकरणाच्या दोन टोकांमध्ये अनेक वेगवेगळी घराणी बसू शकतात. दोन घराण्यांची वैशिष्ट्ये एकत्र करुन काही वेगळे घराणे बनू शकते. सध्याच्या विद्वान गायकांमध्ये घराण्याच्या चौकटीत राहून स्वरांचे लगाव, आवाजाचा लहान-मोठेपणा (ध्वनिक्षेपण तंत्रामुळे) रागाची बढत (उपज), तानक्रियेतील रागशुद्धता आणि

शब्दोच्चार यांमध्ये बदल आणण्याचा प्रयत्न दिसतो. हे बदल लोकांनाही आवडत आहेत असे दिसते. असे परिवर्तन होऊन लोकांना जे रुचेल तेच गाणे टिकेल. सादरीकरणाच्या वेगवेगळ्या पद्धती तयार होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे छापाचे गणपती तयार करण्याचा दोष त्या त्या घराण्यास लागणार नाही. सर्वच घराण्यांना हे तत्त्व लागू आहे. मात्र असे करत असताना परंपरा पूर्णपणे झुगारूनही चालणार नाही. परंपरा आणि नाविन्य हातात हात घालून नवनिर्मितीकडे झेपावल्या पाहिजेत.

-------*------

## घराण्यांचे भवितव्य

घराण्यांचा वृथा अभिमान आजच्या काळात योग्य नाही. तरीही घराणेदार गायकीचा अभिनिवेष आणि ती टिकविण्याची जिद्द यामुळे या परंपरा आणि पर्यायाने हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत टिकून राहिले यात शंका नाही. गुरुचे संपूर्ण गाणे शिष्याच्या गळ्यावर चढू शकत नाही. शिष्यही त्यात वकूबाप्रमाणे बदल करतो. संगीतासारख्या उत्स्फूर्त प्रतिभेच्या कलेला कुठल्यातरी चौकटीत बंद करणे खरेच अन्यायाचे आहे.

गुरुकूल पद्धतीच्या अभावामुळे हल्ली कॅसेट रेडिओच्या जमान्यात इतर गाणेही ऐकावयास मिळते. त्यामुळे झापडे लावून शिकणेही अशक्यप्राय झाले आहे. उत्तम, ज्ञानी आणि व्यासंगी गायकशिक्षकांची वानवाच आहे. शासनाचा आश्रय नसल्याने विद्येचा व्यासंग करणे गुरुंनाही कठीण आहे. सध्याच्या महागाईच्या काळात साधे शिक्षणही न परवडणारे होऊ पहात आहे.

ग्वाल्हेर घराण्याची परंपरा पहात असताना पूर्वीच्या काळापासून नवनवीन प्रयोगांना वाव मिळालेला दिसतो. वेगवेगळ्या वळणाच्या विभिन्न तालातल्या बंदिशी एकाच रागात निबद्ध करण्यामागे परंपरेतुन नाविन्य साधण्याचा सातत्याचा प्रयत्न ग्वाल्हेर गायकीत दिसून येतो. रागातील उपज, सपाट ताना, बोलताना आणि लयकारी या वैशिष्ट्यांमुळे चौकटीत राहूनही कलावंताच्या प्रतिभेला पूर्ण वाव मिळत असल्याने कितीही बदल झाले तरीही ग्वाल्हेर गायकी टिकून राहील असा विश्वास वाटतो आणि त्यामुळे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतही जिवंत राहील यात संशय नाही.

॥श्री॥

सर्वेऽपि सुखिनः सन्तु

सर्वे सन्तु निरामयाः

सर्वे भद्राणि पश्यन्तु

मा कश्चित् दुःखमाप्नुयात्

ना. वा. दिवाण